प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

**दि. १३.०८.२०२१**

**सिडकोच्या कोविड योद्धे आणि गणवेषधारी कर्मचाऱ्यांकरिता विशेष गृहनिर्माण योजनेचा १५ ऑगस्ट २०२१ रोजी ऑनलाइन अर्ज नोंदणी शुभारंभ**

सिडको महामंडळाच्या कोविड योद्धे आणि गणवेषधारी कर्मचाऱ्यांकरिता असलेल्या विशेष गृहनिर्माण योजनेचा प्रारंभ या वर्षीच्या स्वातंत्र्यदिनी १५ ऑगस्ट २०२१ रोजी होणार असून या दिवशी योजनेच्या ऑनलाइन अर्ज नोंदणीचा शुभारंभ करण्यात येणार आहे. या योजने अंतर्गत सिडकोकडून संपूर्ण महाराष्ट्रातील कोविड योद्धे आणि गणवेषधारी कर्मचाऱ्यांकरिता नवी मुंबईच्या ५ नोड्समध्ये ४,४८८ सदनिका उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

सन २०२० च्या प्रारंभी संपूर्ण जगावर कोरोना (कोविड-१९) महासाथीचे संकट कोसळले. कोरोनाचा प्रसार रोखण्यासाठी संपूर्ण देशभर टाळेबंदी लागू करण्यात आल्याने बहुतांशी दैनंदिन व्यवहार ठप्प झाले होते. परंतु अशा बिकट परिस्थितीतीतही डॉक्टर, परिचारिका, वैद्यकीय कर्मचारी, पोलीस, सफाई कर्मचारी आणि अन्य अत्यावश्यक सेवांमधील कर्मचारी हे कोविड योद्धे बनून, आपल्या जीवाची पर्वा न करता समाजाप्रतिचे आपले कर्तव्य अव्याहतपणे पार पाडत राहिले. या कोविड योद्ध्यांमुळे मोठ्या प्रमाणावर होणारी संभाव्य प्राणहानी टळली तसेच अत्यावश्यक सेवांचा नागरिकांना अविरतपणे पुरवठा होत राहिला. या कोविड योद्ध्यांप्रति कृतज्ञतेची भावना म्हणून या योद्ध्यांचे हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी, महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शनाखाली सिडकोने ही विशेष गृहनिर्माण योजना आणली आहे.

**"कोविड योद्ध्यांच्या अविरत मेहनतीमुळे आज आपल्याला भविष्याबाबत आशेचा किरण दिसतोय... कोविड योद्ध्यांनी अनुकूल परिस्थितीत देशाच्या रक्षणासाठी अहोरात्र मेहनत केली... त्यांच्या या मेहनतीचा आम्हाला अभिमान वाटतो... त्यांच्या या कार्याला सलाम करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शनाखाली सिडको विशेष गृहनिर्माण योजना घेऊन येत आहे..."**

**श्री. एकनाथ शिंदे**
**मा. मंत्री, नगरविकास व पालकमंत्री ठाणे**

**"कोविड योद्ध्यांनी कोरोनापुढे हार न मानता त्या परिस्थितीचा सामना केला... त्यांच्या या लढ्याचा आम्हाला अभिमान वाटतो... कोविड योद्ध्यांप्रमाणेच त्यांच्या कुटुंबाचे योगदानही आपल्याला कोरोनाशी लढा देण्यास महत्वपूर्ण ठरले आहे ... त्यांनी आपले वर्तमान सुरक्षित केले आहे, तेव्हा आता त्यांचे व त्यांच्या कुटुंबियांचे भविष्य सुरक्षित करणे ही आम्ही आमची जबाबदारी समजतो... त्यांच्या या योगदानाचा सन्मान करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शनाखाली सिडकोने ही विशेष गृहनिर्माण योजना आणली आहे..."**

**डॉ. संजय मुखर्जी**
**उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

सदर गृहनिर्माण योजनेंतर्गत नवी मुंबईच्या तळोजा, कळंबोली, खारघर, घणसोली आणि द्रोणागिरी या ५ नोड्समध्ये **४,४८८ सदनिका** उपलब्ध करून देण्यात आली आहेत. एकूण ४,४८८ सदनिकांपैकी १,०८८ सदनिका या प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी (ईडब्लूएस) आणि उर्वरित ३,४०० सदनिका सर्वसाधारण प्रवर्गाकरिता आहेत. तसेच वैधानिक तरतुदींनुसार काही घरे ही अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जमाती, विमुक्त जाती, दिव्यांग प्रवर्गांकरिता राखीव आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या २९ मे २०२० रोजीच्या शासन निर्णयानुसार कोविड-१९ महासाथीच्या काळात रुग्ण सर्वेक्षण, रुग्णांचा माग काढणे, प्रतिबंध, चाचणी, उपचार आणि सहाय्यता उपक्रमांशी संबंधित शासनाच्या विविध विभागांतील कर्मचारी, कोविड संबंधी कर्तव्यावर असणारे आरोग्य कर्मचारी व अन्य कर्मचारी (जिल्हा प्रशासन, पोलीस, होम गार्ड, अंगणवाडी सेविका, वित्त आणि कोषागार, अन्न आणि नागरी पुरवठा, पाणी पुरवठा आणि स्वच्छता, घरोघरी जाऊन सर्वेक्षणाचे नेमून दिलेले विविध विभागांचे कर्मचारी इ.) तसेच कोविड संबंधी कर्तव्यावर असणारे कंत्राटी/बाह्यकंत्राटी/रोजंदारी/तदर्थ/मानधन तत्त्वावरील कर्मचारी यांना या योजनेचा लाभ घेता येणार आहे. याकरिता, या संदर्भात संबंधित कर्मचाऱ्यांकडे सक्षम प्राधिकाऱ्याकडून देण्यात आलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक असणार आहे.

योजनेशी संबंधित सविस्तर माहिती जसे, घरांचा तपशील, विविध प्रवर्गांकरिता राखीव घरे, अनामत रक्कम, योजनेचे वेळापत्रक इ. **https://lottery.cidcoindia.com** या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या माहिती पुस्तिकेमध्ये **(Scheme Booklet)** नमूद आहे. तरी अर्जदारांनी या पुस्तिकेचे काळजीपूर्वक अवलोकन करावे. राज्यातील अधिकाधिक कोविड योद्धे आणि गणवेषधारी कर्मचाऱ्यांनी या विशेष गृहनिर्माण योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन सिडकोकडून करण्यात आले आहे.

---

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**